# नागपूर शहरातील बालश्रमिकांच्या समस्या

किरण नामदेवराव पेठे
संशोधक

**प्रस्तावना**

बालश्रमिकांची समस्या ही आजच्या काळात संपूर्ण जगामध्ये अत्यंत महत्वाची व सर्वांशी संबंधित अशी समस्या आहे. विशेषत: अविकसित आणि विकसनशील देशांमधील बालश्रमिकांची धक्कादायक वाढती संख्या यांकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सरकारे सामाजिक संस्था आणि शास्त्रज्ञ यांचे लक्ष वेधून घेतले आहे. बालकांच्या विकासातील अडसर आणि बालश्रमिकांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने आज जागतिक जागृती निर्माण करण्यात येत आहे.

बालविकासाच्या प्रश्नाशी निगडीत असलेली समस्या म्हणून बालमजुरीच्या समस्येचा उल्लेख करता येईल. बालपणचे दिवस हे मौजमस्ती करण्याचे व जीवनाचा आनंद लुटण्याचे दिवस. परंतू काही दुर्दैवी मुलांच्या नशीबी मात्र बालपणाच्या दिवसांचा आनंद घेण्याऐवजी पोटासाठी काबाडकष्ट करण्याचेच आलेले असते. त्यातूनच बालमजुरीची समस्या निर्माण होते.

कोवळ्य वयातील मुलांची मोठ्य संख्येने होणारी पिळवणूक, त्यांना मिळणारा अल्प मोबादला, सामाजिक आणि बौद्धीक विकासाला हानीकारक आहे. लक्षावधी बालकांना यामुळे आपल्या निरागस बालवयाला मुकावे लागते. भारतातून दरवर्षी एक लाखांपेक्षा जास्त मुलंमुली बेपत्ता होतात. गायब झालेल्या या बालकामगारांची अनेकदा मजूर म्हणून विक्री केली जाते. बिहार, उत्तरप्रदेश, ओडीसा, झारखंड या ठिकाणी असलेल्या प्लेसमेंट एजन्सीकडून मुलांची तस्करी केली जाते.

आंतरराष्ट्रीय श्रम संस्थेने म्हटल्यानुसार बालश्रमिकांची समस्या ही देशाच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी खोलवर रूजली आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकरण आणि समाजाचे वाढते शहरीकरण यामुळे हा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. गरीबी, बालविवाह, नैसर्गिक आपत्ती (पूर, वादळ) बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव यामुळे भारतात मोठ्य प्रमाणावर बालकामगार निर्माण होतात. घरकाम, बांधकाम क्षेत्र, डायमंड कंपनी, फटाक्यांची निर्मिती, विडी कारखाना, सर्कस इ. ठिकाणी बालकामगार काम करतांना आढळतात. याशिवाय विटाभट्टी, अगरबत्ती उद्योग, हॉटेल, लग्नसमारंभात दिवे घेऊन जाणे, कचरा वेचणे, सुपारी फोडणे, रिबीन तयार करणे, पानटपरी इ. ठिकाणी सुद्धा बालमजूर काम करताना आढळतात.

जगातील सर्वच देशांमध्ये बालकामगारांचा प्रश्न दिवसेंदिवस व्यापक बनत आहे. जगातील विविध देशात सुमारे ५ ते १२ वयोगटातील १२० दशलक्षापेक्षा जास्त बालके पूर्णवेळ कामावर ठेवली जातात. ह्यचाच अर्थ जगातील एकूण बालकामगारांपैकी ६१ टक्के किंवा जवळजवळ १५३ दशलक्ष बालकामगार आशिया खंडातच आहे. ८० दशलक्ष अफ्रिकेत व १७५ दशलक्ष लॅटीन अमेरिकेत आहे. शेष १३० दशलक्ष बालकामगार अर्धवेळ काम करतात. आशिया खंडातील भारत, पाकीस्तान व बांगलादेश या तीन देशात जगातील सर्वात जास्त बालकामगार आहे.

<u>भारतातील</u> बालकामगारांच्या व्यापकतेबद्दल वेगवेगळे अंदाज वर्तविण्यात आले आहे. <u>२०११ च्या जणगणनेप्रमाणे</u> विविध राज्यात देशात एकूण कामगारांमध्ये बालकामगारांचा वाटा उत्तरप्रदेशात सर्वात जास्त म्हणजे ८.९६ लाख इतका आहे. त्या खालोखाल महाराष्ट्र ४.९६ लाख, बिहार ४.५१ लाख, आंध्रप्रदेश ४.०४ लाख, मध्यप्रदेश २.८६ लाख, राजस्थान २.५२ लाख आणि गुजरात २.५० लाख असा क्रम आहे. महत्वाची बाब म्हणजे देशाच्या उत्तर पूर्व भागात सर्वसामान्य बालकामगारांच्या आकारातील वाढ ही मोठ्य प्रमाणात असण्याचे दिसून येते. तर सर्वात कमी बालकामगारांचे प्रमाण लक्षद्वीप मध्ये २८ इतके आहे. दमन दीव येथे ७७४ तर अंदमान निकोबार बेट येथे ९९९ इतके आहे.

भारतात विविध व्यवसायात काम करण्याऱ्या बालकामगारांचे प्रमाण पाहिल्यास असे दिसते की गुजरातमधील सुरत येथे जवळपास १५००० मुले हीरे, रत्न व जवाहीर यांना पॉलीश करणाऱ्या धोकादायक कामात गुंतलेले आहेत. उत्तरप्रदेशातील वाराणसी येथे ४४०९ मुले जरीच्या साड्या बनविणे व त्यावर नक्षीकाम करणे या कामात आहे. राजस्थान येथे गालीच्या व्यवसायात १२०००, खुजी येथे मातीची भांडी बनविण्याच्या व्यवसायात ४०,००० तर फिरोझाबाद येथे काचकाम कारखाण्यात व काचेच्या बांगड्या बनवण्याच्या धोकादायक उद्योगात अनुक्रमे ५०,००० व २५,००० बालकामगार श्रम करीत आहेत. बालकामगारांचे सर्वात जास्त प्रमाण जम्मू कश्मीर येथे विणण्याच्या व्यवसायात असून ते १ लाख इतके आहे. सर्वात कमी बालश्रमिक पाटी–पेन्सिल व्यवसाय, अगरबत्ती, टेक्सटाईल, सिल्क काम, कुलुप बनविणे या व्यवसायात दिसते.

विविध राज्यातील बालकामगारांचे प्रमाण पाहिल्यास देशात एकूण कामगारांमधील बालकामगारांचा वाटा उत्तर प्रदेशात सर्वात जास्त म्हणजे १५ टक्के आहे. २००१ च्या जनगणनेप्रमाणे बालकामगारांच्या संख्येबाबत आंध्रप्रदेशाचा दुसरा क्रमांक त्यानंतर राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार असा क्रम आहे. उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश व बिहार या पाच राज्यात एकूण बालकामगारांपैकी ५३ टक्के असून कर्नाटक महाराष्ट्र व पश्चिम बंगाल या तीन राज्यांमध्ये २० टक्के बालकामगार आहेत.

अप्पर कामगार आयुक्त कार्यालयातील प्राप्त माहितीनुसार १९९७ ते २००२ या कालावधीत सर्व शिक्षा मोहीम अंतर्गत नागपूर जिल्हयात आढळून आलेल्या ५ ते १४ आणि १५ वयोगटातील शाळाबाह्य मुलांची धोकादायक व अधोकादायक उद्योगात असलेल्या बालमजुरांसंबंधीची माहिती लक्षात घेतल्यास असे निदर्शनास येते की एकूण ७०१ बालकामगारांपैकी २५७ बालकामगार धोकादायक व ४४४ बालकामगार अधोकादायक उद्योगात आढळले. यापैकी कार्यालयाद्वारे टाकलेल्या धाडी अंतर्गत मुक्त केलेल्या बालकामगारांची संख्या २०१२ मध्ये १५ तर २०१३ मध्ये ०४ इतकी आहे.

**संदर्भ :**

बालकामगारांची समस्या ही प्राचीन आर्थिक आणि विश्वव्यापी समस्या असनू अनेक विकसनशील आणि विकसित राष्ट्रांत अस्तित्वात आहे. बाल कामगार प्रथेमुळे पुढच्या पिढीचे शिक्षण आणि आरोग्य हिरावल्या जात आहे. त्यांना विविध प्रकारच्या धोकादायक किंवा अन्य सर्व साधारण उद्योगातून राबवून घेतले जातात.

शैक्षणिक संधीचा अभाव, गरीबी किंवा कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा बेकारीपणा, पालकांचा याविषयीचा दृष्टीकोण यामुळे मुलांना काम करावे लागते. बालकामगार ही एक दु:प्रवृत्ती आहे. बालमजुरीच्या संदर्भात अनेक व्याख्या करण्यात आल्या आहेत. संविधानाच्या २४ व्या अनुच्छेदात स्पष्ट लिहीले आहे की, १४ वर्षाखालील मुलांकडून खाणी व कारखान्यांमधून काम करवून घेतले जाणार नाही. विशेषकरून जी कामे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम घडवून आणतात.

बालकामगार प्रथेला जबाबदार कारणांमध्ये आर्थिक कारणांबरोबरच सामाजिक करणे सुद्धा तेवढीच जबाबदार आहे. वर्णव्यवस्थेवर आधारित समाजरचना बालमजुरीचे मुळ कारण आहे. देशाचे उद्याचे भविष्य ठरविणाऱ्या या बालश्रमिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या विकासासाठी शासनाने केलेल्या विभीन्न प्रयत्नांचे अध्ययन करून बाल श्रमिकांच्या संदर्भातील कायद्यच्या तरतुदींचा अभ्यास करणे व त्याचा त्यांना किती फायदा झाला याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**उद्देश:**

१. बालश्रमिकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
२. बालश्रमिकांच्या संदर्भातील कायद्यच्या तरतूदींचा अभ्यास करणे.
३. बाल श्रमिकांच्या संदर्भातील नियम, शासकीय धोरण याची अंमलबजावणी निट होते किंवा नाही हे तपासून बघणे.

४. बालश्रमिकांच्या विकासासाठी शासनाने केलेल्या विभिन्न प्रयत्नांचे अध्ययन करून बालश्रमिकांचे शोषण होते काय हे जाणून घेणे तसेच त्यांच्या समस्या दूर करण्याकरीता उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने बालश्रमिकांचा अभ्यास करणे.

**कारणे :**

बालकामगार समस्येची विविध कारणे असून ती एक दुसऱ्यांशी संबंधित आहे. ती पुढीलप्रमाणे –

१) दारिद्र्य २) मोठे कुटुंब ३) बेकारी ४) जमीन व मालमत्ता यांचे विषम विभाजन ५) बेकारी ६) सामाजिक व सांस्कृतिक घटक ७) शैक्षणिक मागासलेपण व पालकांचे अज्ञान ८) वाढती लोकसंख्या ९) बालकामगार कायद्याच्या अंमलबजावणीतील निष्काळजीपणा १०) ग्रामीण भागातून रोजगारासाठी शहरात स्थलांतर

**उपाययोजना:**

बालश्रमिकांच्या निर्मुलनासाठी पुढील प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) दारिद्र्य निर्मुलन २) मोफत शिक्षण ३) रोजगाराच्या संधीत वाढ ४) प्राथमिक आणि प्रौढ शिक्षण ५) सामाजिक जागरूकता ६) बेकारीचे निर्मुलन ७) प्रसार माध्यमांचा उपयोग

**सरकारचे प्रयत्न :**

बालश्रमिकांना आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी भारतात अनेक श्रम कायदे पास झाले आहेत. त्यापैकी काही प्रमुख श्रम कायद्यातील तरतुदींची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. बाल श्रम अनुबद्ध कायदा १९३३
२. बाल रोजगार कायदा १९३८
३. मळे श्रमिक कायदा १९५१
४. खान कायदा १९५२
५. कारखाना कायदा १९५२
६. त्यांना शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या सोयी उपलब्ध करून देणे.
७. क्रुरता, दुर्लक्ष आणि शोषण यापासून बालकांचे संरक्षण करणे.
८. १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाला धोकादायक व्यवसायात कामावर ठेवण्यास किंवा जडकाम करण्यास परवानगी न देणे.
९. शारिरीक दृष्ट्या अपंग असलेल्या बालकांची विशेष औषधोपचार, शिक्षण व पुनर्वसनाची सोय करणे.
१०. त्यांची विशेष काळजी घेणे, आपत्तीच्या वेळी बालकांच्या मदत कार्यास प्राधान्य देणे.
११.बालकांच्या हितासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये सुधारणा करणे.

राजकीय इच्छाशक्ती, कायद्याची सक्त अंमलबजावणी दारिद्र्य निर्मुलनाचे मार्ग, व दर्जेदार प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता यामुळे बालकामगारांचे कौटुंबिक व शैक्षणिक पुनर्वसन होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये जागृती, सामाजिक अभिसरण, क्षमतावृद्धी व सचेतन निर्माण करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण आढाव्यातून असे दिसते की बालमजूरी निर्मुलनास आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक आघाड्यांवर कृती होणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध अर्थबळ आणि मनुष्य संसाधनांची कमतरता असल्याने त्यांचा योग्य व पुरेपूर वापर केला पाहिजे. कोणत्याही अर्थपूर्ण कृतीला प्रारंभ करतांना मुलांच्या शोषणाच्या विरोधात सुसंगत धोरणे आणि प्रभावी कृतीप्रयोजना, स्पष्ट उद्दिष्टे, प्राधान्यक्रम निश्चित करणे महत्वाचे आहे.

बालकांच्या कल्याणासाठी सरकारने खालीलप्रमाणे प्रयत्न केले आहे.

१. बालकांसाठी विस्तृत असा आरोग्य विषयक कार्यक्रम
२. बालकांच्या आहारातील कमतरता नष्ट करण्यासाठी सकस आहार देण्याचा कार्यक्रम
३. १४ वर्षे वयापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे.
४. शारिरीक शिक्षण, खेळ व इतर करमणूकीचे तसेच सांस्कृतिक आणि वैज्ञानिक कार्यक्रम, शाळा सामाजिक केन्द्र आणि इतर संस्थामध्ये आयोजित करणे.
५. समाजातील कमकुवत गटातील बालकांना विशेष मदत देणे.
६. बालगुन्हा करणाऱ्या बालकांकडे किंवा ज्यांना बळजबरीने भीक मागण्यास लावले जाते किंवा इतर बालक जे दबावाखाली काम करतात त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे.

आधुनिक औद्योगिक पर्यावरणात बाल श्रमिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक श्रम कायदे करण्यात आले आहेत. तरीसुद्धा भारतातील अनेक उद्योगात काम करणाऱ्या बालश्रमिकांची संख्या ही वाढताना दिसत आहे. औद्योगिक क्षेत्रातील विविध उद्योजगांकडून बाल श्रमिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण केले जात आहे.

भारतातील बाल श्रमिकांच्या समस्येचे स्वरूप लक्ष घेता देशातील प्रत्येक तिसऱ्या कुटुंबातील एक लहान मुलगा उत्पन्न मिळविण्यासाठी मजुरी करीत आहे. म्हणूनच बाल श्रमिकांच्या कामावर पूर्ण बंदी आणण्याची मागणी केली जाते. कारण मुलांच्या शैक्षणिक, शारिरीक आणि मानसिक विकासाकडे अग्रक्रमाने लक्ष देऊन त्यांना आधी रोजगारासाठी सक्षमकेले पाहिजे. यासाठी बालश्रमिकांच्या नियुक्तीला विविध पातळीवरून विरोध केला जातो. तरीपण आजही विविध उद्योगात बाल श्रमिकांचे प्रमाण बरेच जास्त आहे. म्हणून बाल श्रमिकांच्या समस्येकडे सर्व स्तरावरूनच मानवीय दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. शेख, आर.के., बालकामगार समस्या व समाधान, प्रशांत पब्लिकेशन जळगांव
२. बोधनकर, सुधीर चव्हाण, साहेबराव श्रम अर्थशास्त्र, साईनाथ प्रकाशन मार्च २००८
३. पाटील व्ही. बी., मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन आक्टो. १९९६